**DNS BANK**
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक)

(मल्टीस्टेट शेड्युल्ड को-ऑपरेटीव्ह बँक)

वसुली विभाग : एव्हरेस्ट ॲनेक्स, द्वारका हॉटेलच्या वर, डोंबिवली रेल्वे स्टेशनजवळ, डोंबिवली (प.), जि. ठाणे- ४२१ २०२

# जाहीर लिलाव नोटीस (फेरलिलाव)

**३१.१०.२०१५ रोजीस रु. ५,२४,१६,८४०=७५ (रुपये पाच करोड चोवीस लाख सोळा हजार आठशे चाळीस व पंच्याहत्तर पैसे मात्र)** अधिक **०१.११.२०१५** पासूनचे सांपार्शिक दराने पुढील व्याज आणि थकीत कर्जाच्या वसुलीपर्यंत परिव्यय, प्रभार आणि खर्चाच्या वसुलीकरिता त्यांना मंजूर केलेल्या अग्रिमांकरिता मिळकतीचे मालक मे. **अनुसया ऊर्फ पोपटी इंदल नाईक** यांनी **डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड** (बँक) कडे गहाण खालील नमूद मिळकतीची सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमान्वये जाहीर लिलावाने विक्री. बँकेकडे मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा आहे.

| मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | इसारा अनामत रक्कम (इअर) | निरीक्षणाची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| गाव मालखेडे, तालूका जमनेर, जिल्हा जळगावचा धारक गट क्र. ११२, हिस्सा क्र. १ एकूण जमीन मोजमापित ५एच-२६आर (३एच-६९आर+१एच-५७आर-पोट खराबा) पैकी एन.ए. जमीन नॉर्थन साईड बांध - पूर्व-पश्चिम जमीन मोज. २एच-६३आर (१एच-८५आर+०एच-७८-पोट खराबा) सह त्याच्याशी जोडलेले सर्व सुविधाधिकार, अप्रोचेस, आतील रस्ता, रस्ता इ. | २५.०० | २.५० | १७.०९.२०२० स. १०.०० ते दु. ३.०० दरम्यान | ३०.०९.२०२० स. ११.०० वा. पासून |

**लिलावाचे ठिकाण : डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**, वसुली विभाग, एव्हरेस्ट ॲनेक्स, १ ला मजला, द्वारका हॉटेलच्यावर, डोंबिवली रेल्वे स्टेशनजवळ, डोंबिवली (पश्चिम), जि. ठाणे - ४२१ २०२.

**अटी आणि शर्ती :**

१. बोली प्रपत्र आणि विक्रीच्या अटी आणि शर्ती रु. १०००/- **(विना परतावा)** रक्कम प्रदान केल्यावर स. १०.०० आणि दु. ४.०० दरम्यान कोणत्याही कामकाजाच्या दिवशी वरील उल्लेखित पत्त्यावर बँकेच्या वसुली विभागाकडुन प्राप्त करता येतील.

२. बोलीदारांना लिलावाच्या दिवशी बोलीकरिता व्यक्तिशः सहभागी व्हावे लागेल आणि **मुंबई** येथे देय **डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेडच्या** नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेची पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट किंवा **आरटीजीएस/एनईएफटी** च्या मार्गाने इअरसह मोहोरबंद लिफाफ्यातील बोली वसुली विभाग, **डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.** येथे २९.०९.२०२० रोजी किंवा पूर्वी **सायं. ५.०० वा.** प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पोहोचणे आवश्यक आहे. इअरशिवाय आणि/किंवा राखीव रकमेच्या खालील बोली विचारात घेतली जाणार नाही. बोलीचा मोहोरबंद लिफाफा लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी उघडण्यात येईल.

३. इतर कोणतीही व्यक्ती किंवा कॉर्पोरेट प्राधिकरण यांच्यावतीने बोली प्रक्रियेत सहभागी होत असल्यास त्याच्या/तिच्या नावे बोलीदारांद्वारे मान्य झालेले लिखित प्राधिकरण/मंडळ निर्णय प्रस्तुत करावे.

४. मिळकतीची विक्री ही **"जे आहे जेथे आहे आणि जे आहे जसे आहे तत्त्वावर"** काटेकोरपणे आहे आणि इच्छुक बोलीदार हे कोणताही दावा, प्रभार, कर, लेविसेस, थकीत आणि/किंवा मिळकतीविरुद्ध उपार्जित कोणतेही इतर दायित्त्व काही असल्यास, यासंदर्भात त्यांची स्वतःची चौकशी करू शकतात. सदर यशस्वी बोलीदारांना सहन करावे लागणार आहे. मिळकतीवर कोणतेही विद्यमान उपार्जित दायित्त्व असल्यास बँकेला माहित नाही.

५. लिलाव प्रक्रियेत प्रत्येक बोलीदाराला रु. २५,०००/- **(रुपये पंचवीस हजार मात्र)** च्या किमान रकमेने बोली वाढविण्याची परवानगी देण्यात येईल.

६. यशस्वी बोलीदारांना त्यांची बोली स्वीकारल्यावर म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी **सायं. ५.००** च्या आधी बोली रकमेच्या २५% देय (इअर धरुन) त्वरित भरावी लागणार आहे आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरावी लागेल.

७. जर वरील खंड (७) मधील नमूद बोली रकमेचे २५% प्रदान करण्यास यशस्वी बोलीदार कसूरवार ठरल्यास, इसारा रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री ही रद्दबातल केल्याचे गृहीत धरले जाईल, तसेच जर विक्री निश्चितीच्या तारखेपासून **१५ दिवसांत** संपूर्ण रक्कम चुकती करण्यास बोलीदार कसूरवार ठरल्यास बोली रकमेच्या २५% रक्कम बँक जप्त करेल.

८. विक्रीच्या निश्चितीवर आणि देयाच्या अटींच्या अनुपालनाने, प्राधिकृत अधिकारी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ नुसार यशस्वी बोलीदारांच्या नावे विक्री प्रमाणपत्र निर्गमित करतील आणि यशस्वी बोलीदारांना सर्व कर, मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क आणि अनुषंगिक खर्च यशस्वी बोलीदारांच्या नावे नोंदणीकृत विक्री प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहन करावे लागणार आहे. प्राधिकृत अधिकारी फक्त संपूर्ण बोली रकमेच्या प्राप्तीवर शिर्षक मिळकतीचा कब्जा सुपूर्द करतील.

९. प्राधिकृत अधिकारी कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय विक्रीच्या अटी आणि शर्ती सुधारण्याचा आणि कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव/बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा लिलाव पुढे ढकलण्याचा/रद्दबातल करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

१०. इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकारी, **दूरध्वनी क्र. (०२५१)-२४९४८५३, मोबाईल क्र. ९८७०९९५६२५/९८७०९९५६५४** येथे संपर्क साधू शकतात.

स्थळ : मुंबई
दिनांक : ०७.०९.२०२०

सही/-
प्राधिकृत अधिकारी

* उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.